R.No. MHAMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ६ वे, अंक नं. : ९०

दि.२० मार्च २०२६,वार: शुक्रवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रु.

R.No. MHAMAR/25/A3029

दैनिक

E-mail : dainikmhavratt@gmail.com

# महावृत्त

संपादक - अशोक हनवते मो. 9421094991, 7264079990

## जुईनगर येथे (बी.आर.एस. पी) च्या वतीने मा. कांशीरामजी जयंती मोठ्या उत्साहात संपन्न

नवी मुंबई / के. एच. हनवते :-दिनांक: १५ मार्च २०२६ रोजी बामसेफ संस्थापक : मान्यवर कांशीरामजी यांची ९२ वी जयंती डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता भवन, सेक्टर १० सानपाडा नवी मुंबई येथे बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टी संस्थापक, राष्ट्रीय अध्यक्ष : डॉ. सुरेश माने यांच्या प्रमुख उपस्थितीत नवी मुंबई जिल्हाध्यक्ष अँड. नवीन प्रतापे यांच्या पुढाकाराने हा जयंती उत्सव साजरा करण्यात आला, बहुजन समाजाचे महान संघटक व बहुजन चळवळीचे शिल्पकार कांशीरामजी यांच्या जयंतीनिमित्त नवी मुंबई येथे पहिल्यांदाच मान्यवर कांशीरामजी यांचा जयंती उत्सव कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. हा कार्यक्रम नवी मुंबईतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता भवन येथे बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीचे संस्थापक अध्यक्ष : डॉ. सुरेश माने होते. प्रमुख वक्ते म्हणून ओबीसी महासंघाचे अध्यक्ष: ड. प्रदीप ढोबळे आणि ड. दिनेश राजभर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बी.आर.एस.पी.चे युवा नेते डॉ. पंकज चाळके यांनी केले, तर कार्यक्रमाचे




आयोजन व प्रभावी सूत्रसंचालन बी.आर. एस.पी. नवी मुंबईचे नेते ड. नविन प्रतापे यांनी केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला बहुजन साहित्य कला अकादमी चे गायक निलेश गायकवाड यांच्या प्रेरणादायी गीतांनी वातावरण भारावून गेले.

अध्यक्षीय भाषणात डॉ. सुरेश माने यांनी सांगितले की,

मान्यवर कांशीराम यांनी बहुजन समाजाला केवळ राजकीय दिशा दिली नाही, तर सत्तेच्या केंद्रापर्यंत पोहोचण्याची राजकीय जाणीव दिली. आज बहुजन समाजाला त्यांच्या विचारांवर चालत संघटित राजकीय शक्ती उभी करण्याची आवश्यकता आहे. बहुजन समाजाची सत्ता प्रस्थापित करणे हेच कांशीराम साहेबांना खरी अभिवादन ठरेल.

प्रमुख वक्ते ड. प्रदीप ढोबळे यांनी आपल्या भाषणात सांगितले की,

देशातील ओबीसी, दलित, आदिवासी आणि इतर मागास समाज एकत्र आला तरच सामाजिक न्यायाचे स्वप्न पूर्ण होऊ शकते. मान्यवर कांशीराम यांनी बहुजन एकतेची जी राजकीय संकल्पना दिली, ती आज अधिक ताकदीने राबवण्याची गरज आहे.

दुसरे वक्ते ड. दिनेश राजभर यांनीही बहुजन ऐक्याचा मुद्दा अधोरेखित करत सांगितले की,

बहुजन समाजाने राजकीय सजगता वाढवून सत्ता मिळवण्याचा मार्ग स्वीकारला पाहिजे. कांशीराम साहेबांचा संघर्ष हा सामाजिक स्वाभिमान आणि राजकीय अधिकारांसाठी होता. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करतांना डॉ. पंकज चाळके यांनी सांगितले की,

मान्यवर कांशीराम हे बहुजन राजकारणाचे महान शिल्पकार होते. त्यांनी 'जितनी संख्या भारी, उतनी हिस्सेदारी' हा न्याय्य राजकीय सिद्धांत दिला. त्या विचाराला पुढे नेण्यासाठी बहुजन समाजाने संघटित होणे ही काळाची गरज आहे.

या कार्यक्रमाला ज्येष्ठ आंबेडकरी विचारवंत सुरेश केदारे, श्री वेज मीडियाचे संपादक चंद्रकांत सोनावणे, एस. आर. सिंग तसेच बी.आर.एस.पी.चे कार्यकर्ते व विविध आघाड्यांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन ड. चैतन्य कांबळे यांनी केले.

## महापौर व सभागृह नेते सागर नाईक यांचा शब्द-बामणदेव मैदान दहापट सुंदर करून देणार..!

नवी मुंबई / के. एच. हनवते



:-मी महापौर असताना मी मैदान मिळवण्यासाठी दिवस-रात्र प्रयत्न करत होतो आणि तोच मैदान मी कसा हातातून घालू शकतो अशी भावना व्यक्त केली, नेरूळ सेक्टर २६ येथील बामणदेव (झोटींगदेव) मैदानावर प्रस्तावित त्रेीर्ीश्रर-४ रेसिंग स्पर्धा झाल्यानंतर हे मैदान पूर्वीपेक्षा अधिक सुंदर व विकसित करून देणार असल्याचा शब्द महापौर व सभागृह नेते सागर नाईक यांनी दिला,

नेरूळमधील या मैदानावर त्रेीर्ीश्रर-४ रेसिंग ट्रॅक उभारण्याबाबत स्थानिक नागरिकांमध्ये चिंता व्यक्त होत असताना, रेसिंग संपल्यानंतर मैदानाचे संपूर्ण पुनर्विकास करून ते दहापट सुंदर बनवण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.यावेळी स्थानिक नगरसेवक तसेच नेरूळ गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते,

बामणदेव मैदान हे नेरूळमधील स्थानिक तरुण खेळाडूंसाठी अत्यंत महत्त्वाचे क्रीडांगण आहे. त्यामुळे रेसिंग ट्रॅक उभारल्यास क्रीडा संस्कृतीवर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात होती. मात्र सागर नाईक यांनी आश्वासन देत सांगितले की, रेसिंगनंतर मैदानाचे सुशोभीकरण करून तेथे अत्याधुनिक क्रीडा सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील..!

## लातूरच्या गोलाईत उभारली सार्वजनिक गुढी

लातूर :लातूरच्या गंजगोलाईतील जगदंबा मंदिरासमोर गुढी पाडव्याच्या दिवशी गुरुवार १९ मार्च रोजी सकाळी ९.३० वाजता परंपरेप्रमाणे प्रथम मानाच्या सार्वजनिक गुढीचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करून गोलाई भोवती गुढीची मिरवणूक काढत मंदिरासमोर सार्वजनिक गुढी उभारण्यात आली.



येत्या वर्षभरासाठी विविध सामाजीक उपक्रमांचा संकल्प करत प्लॅस्टीकमुक्ती सोबत वृक्ष संवर्धन, स्वच्छता अभियान आणि पाणी बचतीबाबत जनजागृती संदेश देण्यात आला. तसेच झाडे लावा झाडे जगवाचा संदेश देण्यात आला.

प्रारंभी लातूरच्या प्रथम नागरिक महापौर सौ. जयश्री सोनकांबळे, पोलिस अधिक्षक अमोल तांबे, जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी राहूलकुमार मीना, मनपा आयुक्त सौ. मानसी मीना, मनपा क्षेत्रीय अधिकारी समाधान सुर्यवंशी, गंजगोलाईचे नगरसेवक गिरीश ब्याळे, गणेश गवारे, सौ.अग्रवाल, यांच्या हस्ते प्रथम मानाच्या सार्वजनिक गुढीचे पूजन करण्यात आले.

मान्यवरांचे स्वागत संस्थापक अध्यक्ष पंकज जैस्वाल, यंदाच्या महोत्सवाचे अध्यक्ष विकास कांबळे, स्वागताध्यक्ष अमोल गिते, अप्पू भरडे, बालाजी गवळी, विष्णू भुतडा, नितिन पडिले, रामभाऊ जवळगे, नवनाथ भोसले, बालाजी पारसेवार, विद्याताई काळे, डी.व्ही. काळे, प्रभाकर चव्हाण, वामन पाठक, रवि जाधव, संदीप येरावार, सचिन गांगले आदिंनी केले.

तत्पूर्वी सार्वजनिक गुढी महोत्सवाचे संस्थापक अध्यक्ष पंकज जैस्वाल व गतवर्षीचे अध्यक्ष रामभाऊ जवळगे यांच्या हस्ते यंदाचे महोत्सवाचे अध्यक्ष विकास कांबळे आणि स्वागताध्यक्ष अमोल गिते यांच्याकडे यंदाच्या गुढी महोत्सवासाठीचा पदभार सुपूर्द करण्यात आला. त्यानंतर परंपरेप्रमाणे मान्यवरांच्या हस्ते गुढीचे पूजन करून ढोल ताशांच्या गजरात संपूर्ण गंजगोलाई भोवती जंगी मिरवणूक काढण्यात आली.

मिरवणूकी नंतर मान्यवरांच्या हस्ते

विविध क्षेत्रात उल्लेखनिय कार्य केलेल्या व्यक्तीचा प्रशस्तीपत्र देवून मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

यावेळी मान्यवरांची भाषणे झाली.

प्रस्ताविक पतंजलीचे प्रमूख योगशिक्षक विष्णू भूतडा यांनी केले. मनोगत संस्थापक अध्यक्ष पंकज जैस्वाल यांनी केले. गुढी महोत्सवाचे अध्यक्ष विकास कांबळे यांनी वर्षभरातील विविध संकल्प सांगितले. तर स्वागताध्यक्ष अमोल गिते यांनी वृक्ष चळवळीचे महत्व सांगीतले. सुत्र संचलन सारीका डांगे व कलशेट्टी यांनी केले.

पुरस्काराचे मानकरी

डॉ. भास्करराव रामराव पाटील,

शरद केशवराव झरे, आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाउंडेशन, महावितरणचे राहूल गाडे, आर टू आर फाउंडेशनचे राहूल पाटील, माझ लातूर परिवाराचे सक्रिय सदस्य महेबूब उर्फ बाबा शेख, आरोग्यदूत उद्धव तेलंगे, सर्पमित्र भिमाशंकर गाढवे,

योगशिक्षक प्राचार्या सुस्मिता सगरे,

प्राचार्या विद्या काळे, डी. व्ही. काळे,

डॉ. विजय अजनीकर, सर्फराज सय्यद, अँड. आर बी लोंढे, उद्योजक शिरीष जैन व आशिष जैन, डॉ. बी. सी. घाटे, गोविंद राजे, संतोष धाराशिवकर, पत्रकार विनोद कांबळे, लिंबराज पन्हाळकर, सचिन अंकुलगे, रामभाऊ जवळगे, धनराज माने, रशीद तांबोळी, दिनेश कबाडे आदीना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

विविध सामाजीक संदेश

सार्वजनिक गुढी पाडवा महोत्सवाच्या अनुषंगाने पर्यावरण पूरक उपक्रमांचे संदेश देण्यात आले. स्वच्छता संदेश, पाणी बचतीचे महत्व, वृक्ष संवर्धनाचा संदेश, वाहतूक नियमाचे पालन, शिस्तीचे महत्व या बाबत पत्रक वितरीत करून पर्यावरणपूरक जनजागृती करण्यात आली.

प्रारंभी जगदंबा मंदिरातील देवीची अभिषेक पूजा विश्वस्त शिवशंकर पारशेट्टी दाम्पत्य, काळे दाम्पत्यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी नारायण भूतडा, किशोर जैन, प्रभाकर शिरूरे, काकासाहेब घुटे, प्रकाश शिदे, दिनेश कबाडे आदिंचिही उपस्थिती होती.

## समाजभूषण उत्तमराव तरकसे यांच्या हस्ते नवनियुक्त पोलीस पाटील यांचा सन्मान सोहळा संपन्न

बीड,किल्ले धारूर:- गाव पातळीवरील



शासकीय महसूल विभागातील अत्यंत महत्त्वाचे समजले जाणारे तसे प्रत्येक गाव तंटामुक्त ठेवून गावातील शांतता अबाधित ठेवत सर्व जाती धर्म पंथातील गावच्या नागरिकांमध्ये एक सलोखा ठेवत शासन व नागरिक यांच्यातील महत्त्वाचा दुवा म्हणजे गावचा पोलीस पाटील हे पद असतो आणि हेच पद गेली दहा ते पंधरा वर्षापासून बहुतांश जिल्ह्यातील खेडे गावात ही पदे रिक्त होती ती आता शासनाने पात्रता उमेदवारा करवी अर्ज मागवून त्यांची परीक्षा घेऊन जे उमेदवार ही परीक्षा प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले आहेत त्यांच्या सदर गावागावात पोलीस पाटील म्हणून नेमणुका करण्यात आल्या असल्याने बहुतांश गावामध्ये महिला पोलीस पाटील यांच्या जास्त प्रमाणात नियुक्त्या झाल्या आहेत त्याला कारणही असेच म्हणजे जास्तीत जास्त महिलेनेच ह्या परीक्षा दिल्या होत्या आणि महिलाच जास्त उत्तीर्ण झालेल्या असल्याने त्यांच्या नेमणुका करण्यात आल्या आहेत

आसरडोह गावातील नवनियुक्त पोलीस पाटील म्हणून सौ आश्विनी सचिन राठोड (ढोबी तांडा) हया उत्तीर्ण यादीत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाल्याने त्यांची आसरडोहच्या नवनियुक्त पोलीस पाटील म्हणून नियुक्ती झाली असल्याने त्यांचा आसरडोह ग्रामपंचायत कार्यालयाच्या वतीने त्यांचा नागरिक सन्मान समाजभूषण मा श्री उत्तमराव दासू तरकसे आसरडोहकर (महाराष्ट्र शासनाच्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्काराने सन्मानित करपली भाकरकार* ज्येष्ठ साहित्यिक कवी विचारवंत यांच्या हस्ते ग्रामपंचायत कार्यालयात मा आर डी देशमुख मा रविकिरण देशमुख (मा सरपंच) विनोद देशमुख(ग्रामसेवक) सचिन राठोड,बाबू देवकते ज्ञानदेव रामला पवार (परसोबा तांडा आसरडोचे उपसरपंच) विश्वनाथ तोडकर सौ रंजना दत्ता काळे तसेच आसरडोहचे गावकरी समस्त बंधू भगिनी यांचे उपस्थितीत मोठ्या दिमाकांत सन्मान सोहळा साजरा करण्यात आला

महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय...

### चवदार तळे सत्याग्रह : समतेसाठीचा ऐतिहासिक लढा

भारतीय समाजाच्या इतिहासात काही घटना अशा आहेत, ज्या केवळ त्या काळापुरत्या मर्यादित राहत नाहीत, तर त्या संपूर्ण राष्ट्राच्या विचारप्रवाहाला दिशा देतात. डॉ. बी . आर . आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली झालेला चवदार तळे सत्याग्रह ही अशीच एक क्रांतिकारी घटना आहे. महाड सत्याग्रह या आंदोलनाने भारतीय समाजाला समतेचा खरा अर्थ समजावून सांगितला.

त्या काळातील सामाजिक परिस्थिती अत्यंत विषम आणि अन्यायकारक होती. अस्पृश्यतेच्या प्रथेमुळे दलित समाजाला जीवनातील मूलभूत गरजांपासूनही वंचित ठेवले जात होते. महाड येथील चवदार तळे हे सार्वजनिक तळे असूनही दलितांना त्याचा वापर करण्यास मनाई होती, ही गोष्ट त्या काळातील सामाजिक मानसिकतेचे भयावह चित्र उभे करते.

या अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे सोपे नव्हते. परंतु बाबासाहेबांनी केवळ आवाज उठवला नाही, तर तो संघटित चळवळीत रूपांतरित केला. १९२७ साली हजारो अनुयायांसह त्यांनी महाड येथे एकत्र येऊन सत्याग्रहाची हाक दिली. हा संघर्ष केवळ पाण्यासाठी नव्हता, तर मानवी सन्मानासाठी होता.

चवदार तळ्यावर जाऊन स्वतः पाणी पिण्याची बाबासाहेबांची कृती ही सामाजिक व्यवस्थेला दिलेले उघड आव्हान होते. ही कृती प्रतीकात्मक असली, तरी तिचा प्रभाव अत्यंत व्यापक होता. या एका कृतीने समाजातील अन्यायकारक परंपरांना धक्का बसला.

या घटनेनंतर समाजात दोन भिन्न प्रतिक्रिया उमटल्या. एका बाजूला उच्चवर्णीय समाजात संतापाची लाट उसळली, तर दुसऱ्या बाजूला दलित समाजात नवचैतन्य निर्माण झाले. स्वाभिमान आणि हक्कांची जाणीव जागृत झाली.

संपादकीय दृष्टीने पाहता, हा सत्याग्रह भारतीय लोकशाहीच्या मूल्यांचा प्रारंभबिंदू ठरतो. सार्वजनिक साधनांवर सर्वांचा समान हक्क ही संकल्पना याच चळवळीतून दृढ झाली. पुढे हीच तत्त्वे भारतीय राज्यघटनेच्या रूपाने साकार झाली.

आजच्या आधुनिक भारतात कायद्याने सर्वांना समान हक्क दिले असले, तरी सामाजिक पातळीवर अजूनही काही प्रमाणात भेदभाव दिसून येतो. त्यामुळे चवदार तळे सत्याग्रहाचे महत्त्व आजही तितकेच अधोरेखित होते.

ही घटना आपल्याला केवळ इतिहासाची आठवण करून देत नाही, तर वर्तमानाला प्रश्न विचारते. आपण खरोखरच समतेच्या मार्गावर आहोत का? समाजात अजूनही असमानता का टिकून आहे? या प्रश्नांची उत्तरे शोधणे आवश्यक आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला संदेश स्पष्ट होताहक्क मिळवण्यासाठी संघर्ष करावा लागतो, आणि तो संघर्ष तत्त्वनिष्ठ असावा लागतो. चवदार तळे सत्याग्रह हा त्याच तत्त्वांचा जिवंत पुरावा आहे.

समाजाने या घटनेतून प्रेरणा घेऊन समानता, बंधुता आणि न्याय या मूल्यांची अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. हेच खरे त्या संघर्षाचे यश ठरेल.

शेवटी, चवदार तळे सत्याग्रह हा केवळ एक ऐतिहासिक प्रसंग नाही, तर तो मानवतेच्या विजयाचा आणि सामाजिक न्यायाच्या लढ्याचा दीपस्तंभ आहे. अशा घटनांमुळेच समाज प्रगत होतो आणि खऱ्या अर्थाने लोकशाही बळकट होते.

### केज तालुक्यात अवकाळी गाराच्या पावसाने शेतकऱ्यांच्या पिकांचे,फळभाज्यांसह फळबागांचे नुकसान

केज/प्रतिनिधी-केज तालुक्यात अवकाळी गाराच्या पावसाने



शेतकऱ्यांच्या पिकांचे, भाजीपाल्यासह फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.केज तालुक्यातील अनेक गावांमध्ये बुधवारी व गुरुवार रोजी या दोन दिवसात अवकाळी मुसळधार गाराचा पाऊस झाला आहे या अवकाळी पावसामध्ये शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. सध्या,गहू,जवारी,हरभरा व फळभाज्यांचे आणि आंब्यासह इतर फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. शेतकऱ्यांच्या हाता तोंडाशी आलेला घास हा अवकाळी पावसाने हिरावून घेतला आहे. गुरुवार रोजी दुपारच्या वेळी केज तालुक्यातील घाटेवाडी येथे मुसळधार गाराचा पाऊस झाला यामध्ये शेतकऱ्यांचे गहू जवारी, हरभरा, मका व फळभाज्यांचे आणि आंब्यासह इतर फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे.सध्या शेतकरी हा चिंतेत व अडचणीमध्ये आहे या दोन दिवसात तालुक्यात झालेल्या अवकाळी मुसळधार गाराच्या पावसाचा पाऊस पडल्याने शेतकरी बांधव सध्या संकटामध्ये आले आहेत. शासनाने तात्काळ पंचनामे करून मदत द्यावी अशी मागणी शेतकरी वर्गातून केली जात आहे.

# आई चिमणीचे नाव घेऊन घास भरवायची ;आज चिमण्यांना वाचविण्याची जबाबदारी आपल्यावर.

जागतिक चिमणी दिवस साजरा करतांना चिमण्यांना व संपूर्ण पशुपक्ष्यांना कशा पध्दतीने वाचविता येईल यासाठी सर्वांनीच प्रयत्न करायला हवेत.
चिमण्यांना रहाण्याकरीता घरटे नाहीत याकरिता वृक्षारोपण व्हायला हवे, उन्हाळ्यात चिमण्यांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागते. त्यामुळे आतापासूनच जीथे-जीथे चिमण्या येवू शकतात तीथे-तीथे किंवा आपल्या घराच्या भिंतीवर किंवा घरावर एखाद्या तबकड्यात पाणी अवश्य ठेवावे सोबतच खाण्याकरिता थोडे तांदळाचे दाणे किंवा खाद्य टाकावे.कारण चिमण्यांना खरोखरच आपली नितांत गरज आहे.अन्यथा ज्या चिमण्या दिसतात त्या सुध्दा लुप्त होवू शकतात याला नाकारता येत नाही.कारण दिवसेंदिवस चिमण्यांसह इतरही पक्षांचे प्रमाण कमी-कमी होतांना दिसत आहे. चिमण्यांच आपल्या मानव जातीवर खुप मोठे उपकार आहेत ते तर आपण फेडुच शकत नाही.परंतु आज बदलत्या काळानुसार व बदलत्या हवामानामुळे त्यांच्यावर मोठे संकट ओढावले आहे. त्यातुन मुक्त करण्यासाठी थोडा हातभार आपण लावु शकतो याकरिता पाण्याची सोय व खाद्यान्नाची सोय सर्वांनीच आपापल्या परीने केली पाहिजे.चिमण्यांच्या अनुषंगाने अनेक पक्षी पाण्याचा व खाद्यान्नाचा स्वाद अवश्य घेतील आणि आयुष्य वाढेल व चिमण्यांचा किलबिलाट सर्वत्र दिसून येईल.जगातील चिमण्यांची घटती संख्या लक्षात घेता जगातील देशांनी चिमण्यांना वाचविण्याच्या दृष्टीकोनातून जागतिक चिमणी दिवस साजरा करण्याचे जाहीर केले. याकरीता २० मार्च ही तारीख ठरविण्यात आली आणि राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय संस्थांच्या सहाय्याने पहिला जागतिक चिमणी दिवस २० मार्च २०१० ला साजरा करण्यात आला. भारतात सगळीकडे सर्वात जास्त संख्येने सापडणारा, मानसाच्या जवळपास वावरणारा व नेहमी डोळ्यांनी दिसणारा पक्षी म्हणून चिमणीची भारतभर चांगलीच ओळख आहे.आज जगातील बदलत्या तापमानामुळे व हवामानामुळे, युद्धजन्य परिस्थिती,परमाणू परिक्षण, वाढते औद्योगिकीकरण, मोबाईलचे टॉवर,वाढते शहरीकरण, जंगलतोड, शेतातील रासायनिक खतांचा वापर व किटकनाशके,वणवे लागणे,ध्वनी प्रदुषण, पाणथळ्यांच्या जागा नष्ट झाल्याने आणि जगातील वाढती यूध्दजन्य परिस्थिती यामुळे चिमण्यांसह अन्य पशु-पक्षांचे जगणे अत्यंत कठीण झाले असुन धोकादायक स्थितीत आहे.यामुळे अनेक पशु-पक्षी लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत. आज जंगल तोडीमुळे जंगलातील पशु-पक्षी शहराकडे धाव घेतांना दिसते. हा संपूर्ण प्रकार निसर्गाचा होत असलेल्या ह्रासामुळे दिसून येतो व मानवजातीच्या अतीक्रमनामुळे निर्माण झाला आहे.पुर्वी कवेलुचे घर असायचे, मातीच्या भिंती असायच्या त्यामुळे चिमण्या आपले घरटे कुठे तरी अवश्य बनवायचे. कारण कवलाचे घर व मातींच्या भिंती नेहमी थंड असतात याचा सहारा घेऊन रहायचे. त्यामुळे प्रत्येक घरामध्ये आपल्याला चिमण्यांचे घरटे अवश्य दिसायचे व चिमण्यांचा मधुर किलबिलाट ऐकू यायचा.यावरून सकाळचा काय वेळ झाला आणि संध्याकाळचा काय वेळ झाला हे त्यांच्या किलबिलाट वरून ताबडतोब सर्वांनाच लक्षात यायचे.परंतु आज चिमण्यांचा किलबिलाट नामशेष झाल्याचे दिसून येते. आज चिमण्यांना घरटे बांधण्यासाठी योग्य जागा मिळत नाही, पाण्यासाठी वणवण हिंडावे लागते अशी भयावह परिस्थिती आज चिमण्यांची झाली आहे.आज घरांचे सिमेंटीकरण झाल्याने चिमण्यांना घरटे बांधण्यास मोठा संघर्ष करावा लागतो आहे.वाढत्या प्रदुषणांमुळे व उष्णतामानामुळे चिमण्यां व इतर पशु-पक्षांना हवेत मोकळा स्वास सुध्दा मिळु शकत नाही.अशी कठीण व गंभीर परिस्थिती पशु-पक्षांवर असलेली आहे. आपण चीनचा विचार केला तर १९५८-६२ या कालावधीत चार किटक मोहिम राबविण्यात आली त्यात पिकांचा नाश करणाऱ्या घटकांना म्हणजे उंदीर,माश्या,डास आणि चिमण्या हे चार नष्ट करायचे सरकारने ठरविले.यामुळे चीनमध्ये चिमण्या जवळपास संपुष्टात आल्याचे दिसून येते. त्यामुळे याचा गंभीर परिणाम चीनच्या पर्यावरणावर झाला आहे. यानंतर पक्षी तज्ज्ञांनी अभ्यासाच्या अंती सांगितले की चिमणी पर्यावरणाच्या दृष्टीने जगाला आवश्यक आहे. जगभरात २६ जातिंच्या चिमण्यांची नोंद आहे. परंतु यातील अनेक चिमण्यांच्या जाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. जगातील पक्षांचा विचार केला तर ८६७ प्रजाती आहेत.परंतु गेल्या पंचवीस वर्षांत आतापर्यंत पक्षांच्या संख्येने सर्वात मोठी घट झाली आहे ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे. त्याचप्रमाणे कीटकभक्ष्यी चिमण्यांची संख्या कमी होने अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे. कारण चिमण्यांची घटती संख्यांचा प्रश्न सामान्य माणसाच्या दैनंदिन जीवनावर परिणाम करणारा आहे.कारण पिकांवर पडणाऱ्या अळ्या आणि किटक चिमण्या खायच्या परंतु चिमण्यांच्या घटत्या संख्येमुळे पिकांवर सुध्दा दुष्परिणाम होतांना दिसतो. एकेकाळी चिमणी हा आपला अत्यंत महत्त्वाचा पक्षी होता कारण लहान मुले जेवणाकरीता कंटाळा करायचे तेव्हा आपली आई किंवा आजी चिमणीची आठवण अवश्य करायची व लहान मुले पोटभर जेवण सुध्दा करायची. चिऊताई-चिऊताई चारा खा, पाणी पी आणि भुर्र उडून जा असे म्हणत आपला घास भरत यामुळे आपलं बालपण समृद्ध झाले.कारण आई व आजी इतर पक्षांची ओळख करून देतांना चिऊताईचा लाड जास्तच करायची. चिमण्यांनी आपल्याला बरेच काही दिले त्यामुळे आज त्यांना आपल्या कडून फक्त पाण्याची अपेक्षा आहे ती आपण अवश्य पुर्ण करू या.जागतिक चिमणी दिवसाचे औचित्य साधून भारतासह जगातील संपूर्ण देशांनी आजच्या दिवशी मोठ्या प्रमाणात वृक्षारोपणाचा संकल्प करावा व वृक्षारोपण करावे.यामुळे गुरांना चारा,पशु-पक्षांना रहाण्यासाठी घरट्यांसाठी जागा उपलब्ध होईल, मानवाला शुद्ध हवा व ऑक्सिजन मिळण्यास मोठी मदत होईल.यामुळे पर्यावरण सुधारण्यास मदत होईल व निसर्ग प्रफुल्लित राहील आणि जिकडे-तिकडे हिरवागार गालिचा पसरलेला दिसुन येईल. आपण सर्वांनीच चिमण्या वाचविण्याचा संकल्प करूया.जय हिंद!

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर**

# महाडचा रणसंग्राम प्रेरणादायी इतिहास.

इतिहास वाचला तर इतिहास घडविता येतो असे म्हणतात. मग डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी २० मार्च १९२७ रोजी महाडच्या चवदार तळ्यावर समताधिष्ठित बहुजन समाजासाठी सत्याग्रह केला.यंदा या सत्याग्रहाला ९९ वर्ष पूर्ण होत आहेत.आणि शताब्दी महोत्सवाची सुरवात होत आहे.महाडचा रणसंग्राम हा केवळ पाण्यासाठी नव्हता तो मानवी मूलभूत हक्कांसाठी होता. बाबासाहेब त्या वेळी सांगत होते चवदार तळ्याचे पाणी प्यायल्याने आम्ही अमर होऊ अशातला भाग नाही.आज पावेतो चवदार तळ्याचे पाणी प्यायलो नव्हतो तर तुम्ही-आम्ही काही मेले नव्हतो.चवदार तळ्यावर जावयाचे ते केवळ त्या तळ्याचे पाणी पिण्याकरीता जावयाचे नाही.तर इतरांप्रमाणे आम्हीही या समाजातील माणसे आहोत हे सिद्ध करण्या करीताच त्या तळ्यावर आपणास जावयाचे आहे. असे अंगावर शहारे आणणारे उद्गार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी २० मार्च १९२७ रोजी चवदार तळ्याच्या ऐतिहासिक सत्याग्रह आंदोलनाच्या वेळी काढले होते. त्याला २० मार्च २०२६ ला ९९ वर्षे पूर्ण होत आहेत. शताब्दी महोत्सवी वर्षाची सुरवात होत आहे.पण त्या सत्याग्रहची आंबेडकर अनुयायांनी कोणती प्रेरणा घेतली हा संशोधनाचा विषय आहे. आमच्यात संघटनात्मक कोणता बदल झाला?. यांचे आत्मचिंतन आणि परीक्षण करण्याची तयारी आंबेडकरी चळवळीतील नेत्यात,कार्यकर्त्यात आणि अनुयायात असावी. इतिहास वाचला तर इतिहास घडविता येतो असे म्हणतात. मग आम्ही इतिहास घडवितो की भूगोल करतो?.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या क्रांतिकारी विचाराचा जाहीरपणे खुन करणे हा आंबेडकर अनुयायीचा जन्म सिद्ध अधिकार आहे असेच ते वागतात.१४ एप्रिल १८९१ ते ०६ डिसेंबर १९५६ या काळात जे जे ऐतिहासिक कार्य डॉ.भिमराव आंबेडकर यांच्या हातून घडले.त्या त्या दिवसाला आंबेडकरी अनुयायी लाखोच्या संख्येने एकत्र येऊन जाहीर पणे क्रांतिकारी विचाराचा त्याच ठिकाणी खून करून तो उत्सव खूप मोठ्या प्रमाणात साजरा करतात.कारण तो दिवस त्याच्या साठी खूप महत्वाचा असतो.कारण त्याच दिवसी गल्लीबोळातील नेत्याचा ८ ु १० चा बॅनर,होडींग आणि १० ु १२ चा स्टेज बांधून जनतेला आपली शक्ती दाखविण्याची सुवर्ण संधी मानतात.ती संधी गमवायला कोणीच तयार नसते.या दिवसाचे त्या काळाचे महत्व आज आमच्यासाठी काय आहे. हे आम्हाला विचारण्याचे, सांगण्याचे धाडस कुणी करू नये.आम्हाला आंबेडकर अनुयायी, भक्ता एवढे तुम्हाला त्याचे महत्व कळणार नाही.आमच्या रक्तात आंबेडकरी चळवळ असते. जन्मताच आम्ही आंबेडकरवादी असतो.२० मार्चला लाखो लोक महाडला जातात आणि काय करतात?. २० मार्च १९२७ चे गांभीर्य कोणत्या गटाच्या नेत्याकडे असते. किंवा नगरा नगरातील मंडळ,महिला मंडळाकडे असतो काय?.हे प्रत्येकांने आत्मचिंतन करावे.

महाराष्टातील खेड्या पाड्यातील गांवकुसा बाहेर राहणारी महार फक्त महार माणस महाडला पाणी पिण्यासाठी जाणार नव्हते.तरी बाबासाहेबांनी महाराना पिण्याचे पाणी खुले करण्यासाठी महाडचा सत्याग्रह केला.आणि महाडचे चवदार तळे अजरामर झाले. ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या सत्याग्रहामुळे,महाडच्या चवदार तळ्याच्या एतिहसिक सत्याग्रहाला आज २० मार्च २०२६ ला ९९ वर्ष पूर्ण होत आहेत. २१ मार्च पासून शताब्दी महोत्सवी वर्षाची सुरवात होत आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरानी आजच्याच दिवसी २० मार्च १९२७ साली चवदार तळ्याचा सत्याग्रह केला आणि तळ्याचे पाणी सर्व मानवजाती साठी खुले केले. केवळ महार जातीसाठी चवदार तळे नव्हते.डॉ. बाबासाहेबाच्या क्रांतिकारी विचाराने चवदार तळाच्या पाण्याला हात लावताच आग लागली.ती महाड मध्ये सुरु झाली आणि राज्यातून देशभर पसरली.ते क्रांतिकारी वैचारिक संघटन कैशल्य आज कोणत्याही नेत्याकडे नाही. त्या ऐतिहसिक घटनेला २०२६ ला ९९ वर्ष पूर्ण होत असले तरी नेहमी सारखे कार्यकार्माचे आयोजन महाडला असणार आहे.लोक एकदिवसाची पिकनिक म्हणून उत्साहात साजरी करणार,काही लोक चवदार तळ्याचे पाणी बॉटल मध्ये भरून घरी घेऊन जातील.त्यातून के प्रेरणा घेतील ?.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी समताधिष्ठित समाजनिर्मिती करण्यासाठीच अहोरात्र प्रयत्न केले. त्याचाच एक भाग म्हणून त्यांनी महाड मुक्कामी चवदार तळे सत्याग्रह आंदोलन केले.बाबासाहेबांनी म्हटल्याप्रमाणे हा केवळ पाणी प्राशन करण्याचा हेतू नाही तर समाजात सर्वच माणसे सारखी.अमुक वरच्या जातीचा,तमुक खालच्या जातीचा असा जातीभेद कशाला? बाबासाहेबांच्या मते,राजकीय, धार्मिक, सामाजिक व आर्थिक बाबतीत समतेचे तत्त्व लागू करणे म्हणजे समाजरचनेतील नीतीच्या पायावर उभे राहण्यासारखे आहे.परंतु घुबडाला सूर्यप्रकाश सहन होत नाही. त्याप्रमाणे सामाजिक विषमतेमुळे ज्यांना जाती श्रेष्ठता मिरवायला मिळते त्यांच्या जातीभेदावर कुऱ्हाड पडलेली पाहून साहजिकच त्यांचा संताप तीव्र होतो. आज ही खेड्या पाड्यातील वातावरण त्याची साक्ष देते.बौद्ध समाजाच्या तरुणाने मराठा समाजाच्या मुलीवर प्रेम केले त्यांचा खून केला जात आहे. तर काही ठिकाणी संशय आला म्हणून घरात कोंडून निर्दयीपणे मारल्या जाते. एवढे भयानक विष यांच्या मनातील मेंदूत भिनले आहे. त्यातून खेड्यात राहणार समाज बांधव काही शिकायला तयार नाही. संघटित राहाल तर कोणी अन्याय अत्याचार करतांना शंभर वेळा विचार करेल. हे १९२७ झालीच सांगितले होते खेडे सोडा,शहर गाठा,स्वताची वसाहत बनवा. त्यातूनच आपले लोकप्रतिनिधी निवडून येतील.पण क्रांतिकारी संदेशातून आंबेडकरी चळवळीचे नेते अनुयायी काही शिकायला तयार नाही.लबाड लांडग्या सोबत मैत्री केली.तर किती दिवस तो जीवदान देईल हा विचार आंबेडकरी विचारांचे लोक करत नसतील तर दिवस ढवल्या अन्याय अत्याचार होत राहतील.ज्यांनी ज्याच्या विरोधात लढण्यासाठी संघर्ष करण्यासाठी संघटित होयाला पाहिजे. त्याच्या सोबत दोस्ती करत असतील तर परिणाम काय होतील. किती दिवस बाबासाहेबांच्या नावाचा जयजयकार करत राहणार. त्यांनी सांगितलेल्या मार्गाने कधी जाणार,ती जिद्ध,ज्ञान मिळवण्यासाठी कष्ट करण्याची तयारी,त्याग आणि संघर्ष आपल्यासाठी कधी प्रेरणादायी होईल?.

आज देशात जातीभेदाचा जो काही प्रकार अनुभवयास मिळत आहे.तो अत्यंत निंदनीय आणि संतापजनक आहे. जातीपातीच्या विषारी झाडाला केवळ उच्चवर्णीयांकडूनच खतपाणी घातले जाते,असे म्हणणे चुकीचे ठरेल.जोपर्यंत एका समाजाकडून दुसऱ्या समाजात रोटी-बेटी व्यवहार होत नाही तोपर्यंत समताधिष्ठ समाजाची निर्मिती अशक्य आहे,असे बाबासाहेबांनी सांगितलेले असताना ही अनेक वेळा बौद्ध आणि नवबौद्ध समाजातील लोकांचा विवाहाच्यावेळी जातीलाच अग्रक्रम असतो.महाडच्या रणसंग्राम भूमीच्या संपूर्ण कोकणात मातृसंस्था आणि पंचायत यातील गावकी भावकीच्या कथा तर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या तथागत बुद्धाच्या धम्माच्या चैकाटीत न सुटणाऱ्या आहेत.एकीकडे बाबासाहेबांचे स्वप्न साकार करायचे असा टेंभा मिरवायचा आणि दुसरीकडे वेळ येताच जाती-पातीला खतपाणी घालायला लावणारी कामे करायची अशी दुटप्पी भूमिका बाबासाहेबांना मानणाऱ्या सुशिक्षित वर्गाने सोडून द्यायला हवी.त्या पेक्षा खेड्यातील अज्ञानी,अशिक्षित,असंघटीत कष्टकरी माणूस आंबेडकरी चळवळी करिता लाख मोलाचा ठरतो. आंबेडकरी चळवळीला मानणाऱ्या समाजाने स्वतःचे आत्मपरिक्षण करून बाबासाहेबांनी केलेल्या महाडच्या रणसंग्रामतून योग्य बोध घ्यावा. महाड चवदार तळे म्हणजे पिकनिक पॉईंट नाही. तर एक क्रांतिकारी प्रेरणादायी इतिहासाचे स्मारक आहे.त्यातून प्रेरणा घेऊन संघटित व्हावे की असंघटित म्हणून गटगटात विभागून घ्यावे?.महाड चवदार तळ्याच्या सत्याग्रहाला शताब्दी महोत्सवी वर्षात एक ओंजळभर पाणी समतेसाठी.. हे अभियान नगरानगरात राबविले पाहिजे. अन्याय अत्याचारा विरोधात संघर्ष करण्यासाठी संघटित झाले पाहिजे.या सत्याग्रहात ज्यांनी ज्यांनी सहभाग घेतला त्यासर्व ज्ञात अज्ञात क्रांतिवीर शहीदच्या निष्ठा,त्याग आणि जिद्दी ला कोटी कोटी प्रणाम.

**सागर रामभाऊ तायडे**
**९९२०४०३८५९, भांडुप मुंबई,**

# विकासात्मक आणि प्रबोधनात्मक दूरदृष्टी असलेलं नेतृत्व असेल तरच विकास होईल!

विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाजात राज्यस्तरीय नामकरणाचा गवगवा करणाऱ्या असंख्य सामाजिक संघटना,संस्था,प्रतिष्ठान तर काही प्रमाणात विविध विकास मंच,युवक संघटना सुद्धा समाजात हिरीरीने कार्यरत असतील या सर्वच संघटनेवर कारभारी म्हणून सुशिक्षित उच्चशिक्षित आणि विद्वान हुशार बुद्धिवान समाज बांधवांचीच पदाधिकारी म्हणून निवड केली जाते याच माध्यमातून एका कर्तबगार पदाधिकाऱ्यांची अध्यक्ष म्हणून निवड केली जाते नंतर हळूहळू समाजात कर्तबगार कर्तृत्ववान आणि कार्यसम्राट,दिग्गज आणि धडाकेबाज युवक नेतृत्व म्हणून समाजात नेतेगिरी करतात किंबहुना समाज नेतृत्व म्हणूनच सुतार सामाजिक क्षेत्रातील विविध कार्यक्रमात आनंदानेच मानसन्मान मिळवतात.

घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटले आहे कि,शासनकर्ती जमात बना आपले संवैधानिक हक्क आणि अधिकार मिळविण्यासाठी राजकीय हिस्सेदारी मध्ये सहभाग महत्वाचा ठरतो आणि वैचारिक चळवळ महत्वाची ठरते. विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाजाची लोकसंख्या राज्यात लक्षणीय असल्याचे सोशल मीडियावर माझ्या वाचण्यात आले आहे आणि सामाजिक संघटनांचा विस्तार हा मात्र राज्यस्तरीय असल्याचे समजले जाते. राज्यातील सामाजिक संघटनांची संख्या जवळपास २०० असेल या संघटनांवर शेकडोंच्या संख्येने कर्तबगार,बुद्धिवान,सुशिक्षित,उच्चशिक्षित पदाधिकारी वर्गाची वर्णी लागलेली असेल याच माध्यमातून समाजात अनके दिग्गज नेते आणि युवक नेते उदयास येतात आणि सामाजिक क्षेत्रात नेतेगिरीच्या आवेशात मोठया दिमाखात वावरतात.

समाजात एखादी संघटना स्थापन करून समाजात सर्व समाजमान्य नेतृत्व उदयास येणार नाही त्यासाठी ठोस अजेंडा असावा लागतो आणि विधायक कार्याचा कृतीआराखडा असणे गरजेचे असते त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे गरजेचे असते.तरुणांसाठी उद्योग व्यवसाय निर्मिती करण्याचा तसेच लग्नाच्या वयाची ३० ते ३५ वर्षे उलटून जात आहेत अशा कितीतरी विवाह इच्छुकांचा विवाह जुळवणी हि मोठी गंभीर समस्या समाजात निर्माण होत आहे यावर तोडगा कशा पद्धतीने काढणार याचा खुलासा कोणालाही करता येणार नाही.सोशल मीडियावर समाज नेतेगिरीचे फलक झळकवून फोटोबाजीच्या माध्यमातून समाजात कार्यसम्राट समाज नेतृत्व कोणत्या नैतिक आधारावर उदयास येईल यावर स्वयंघोषित नेत्यांनी स्वतःआत्मचिंतन आणि आत्मपरीक्षण करावे.

विश्वकर्मीय सुतार समाज ओबीसी प्रवर्गातील ओबीसी घटक असतांना समाजात ओबीसी संदर्भात आरक्षण,जनगणना,संविधान तसेच राजकीय हिस्सेदारी राजकीय प्रतिनिधित्व इत्यादी महत्वपूर्ण विषयावर तथाकथित समाज नेत्यांनी राज्यभरात आपापल्या कर्तबगार नेतृत्वाखाली राज्यभरात ठिकठिकाणी हजारोंच्या संख्येने समाज बांधवांना एकत्रित करून अभ्यासपूर्ण भाषणबाजी करून उपस्थित जनसमुदायाला मंत्रमुग्ध करून समाज जागरूकता अभियान राबविण्यात आले काय?.याचा सुद्धा विचार करण्याची नितांत गरज आहे विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाजातील सुशिक्षित उच्चशिक्षित बुद्धिवान चिकित्सक लोकांनी यावर विचार आणि चिकित्सा करण्याची गरज आहे.

विश्वकर्मीय म्हणून विविध कलागुणसंपन्न गुणधर्म अंगी असणाऱ्या आणि बुद्धिवान सुतार समाजात आर्थिक सुबत्ता निर्माण करण्यासाठी तळागाळातील,उपेक्षित आणि सुशिक्षित बेरोजगार युवकांना,कष्टकरी समाज बांधवांना गोरगरीब महिलांना राज्यभरात उद्दोग व्यवसाय उभारणी करण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले काय?स्वतःला कर्तबगार,कर्तृत्ववान,कार्यसम्राट,दिग्गज,मुरब्बी अनुभवी धुरंधर समाज नेतृत्व समजणाऱ्या तसेच धडाकेबाज,जिगरबाज,तडफदार युवक नेतृत्व समजणाऱ्या तथाकथित स्वयंघोषित नेत्यांनी याचा विचार करण्याची गरज आहे.विशेषतःसमाजात जे स्वतः ला जेष्ठ मार्गदर्शक समजतात त्यांनी सुतार समाजाला कोणत्या प्रकारचे वैचारिक आणि विधायक कार्याबद्दल आणि विकासात्मक कार्याबद्दल थोर मार्गदर्शन करतात त्यांनी याचं आत्मचिंतन आत्मपरीक्षण करणे गरजेचे आहे.

समाजातील सुशिक्षित उच्चशिक्षित बुद्धिवान तसेच चिकित्सक समाज बांधवांनी यावर सखोल निरीक्षण करणे गरजेचे आहे विशेषतःस्वयंघोषित नेत्यांनी सुतार समाजात विविध विषयांवर समाज जागृती निर्माण करण्यासाठी अजिबात प्रयत्न केले नाहीत कारण समाज जागृत झाला तर मात्र स्वयंघोषित नेत्यांना उजळमाथ्याने नेतेगिरीचा मनमुरादपणे आनंद लुटता येणार नाही.समाजात सुशिक्षित,उच्चशिक्षित आणि बुद्धिवान समाज वर्ग जागृत आणि चिकित्सक असतो अशा लोकांना चिकित्सक पध्दतीने अवलोकन करण्याचे तंत्रज्ञान अवगत असते असा समजदार वर्ग कोणत्याही भूलथापांना कधीही बळी पडणार नाही जे अंधभक्त असतात त्यांना चिकित्सक पध्दतीने अवलोकन करण्याचे तंत्रज्ञान अवगत नसते म्हणूनच असा अचिकित्सक वर्ग फसतो आणि भूलथापांना बळी पडतो यासाठीच समाजाने सतत जागरूक असावे.

राज्यस्तरीय नामकरणाचा मुकूट परिधान करून संघटनांचे पदाधिकारी म्हणून नेतेगिरीच्या आवेशात वावरणाऱ्या समाज नेत्यांकडून समाजाच्या काही अपेक्षा असतात ज्यामध्ये सामाजिक सर्वांगीण विकासाठी उद्योग व्यवसाय उभारणी करणे,ओबीसी संदर्भात विविध विषयांवर समाज जागृती निर्माण करणे,समाजाला राजकीय प्रवाहात आणण्यासाठी राजकीय प्रतिनिधित्व मिळविण्यासाठी प्रयत्न करणे इत्यादी काही विधायक कार्याच्या अपेक्षा असतात.समाजात नेतेगिरी करणारे हुशार दिग्गज समाज नेते आणि युवक नेते अपेक्षा पूर्ण करण्यात अपयशी ठरत असतील तर मग समाज कोणाकडून अपेक्षा बाळगणार जर समाजात नेतेगिरीची नैतिक जबाबदारी व्यवस्थित सांभाळता येत नसेल तर मग फक्त नावासाठीच आणि मोठेपणा मिळविण्यासाठी समाज नेतेगिरीसाठी हापापलेपणा कशासाठी?

विश्वकर्मीय सुतार सामाजिक क्षेत्र एकप्रकारे महाकाय सागर आहे याला एखादं छोटंसं डबकं समजू नये.जेवढे खोलवर जाल तेवढेच विषय हाताला लागतील परंतु,स्वयंघोषित पुढाऱ्यांनी विविध विषयांवर समाजात समाज जागृती निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले नाहीत कारण समाज जर जागरुक झाला तर आपली समाजातील स्वयंघोषित नेतेगिरी धोक्यात येईल या भीतीने समाज जागृती निर्माण करण्यासाठी कोणताही स्वयंघोषित पुढारी पुढाकार घेण्यासाठी अजिबात धजावत नाहीत.

ओबीसी सुतार समाजात विकासात्मक कार्याच्या बाबतीत राज्यातील लाखो तरुणांना रोजगाराच्या संधी निर्माण करण्या साठी अर्थात उद्योग व्यवसाय उभारणी करण्या संदर्भात,ओबीसी संदर्भात तसेच राजकीय हिस्सेदारी संदर्भात इत्यादी विधायक कार्याच्या बाबतीत नेतेगिरीचा सुंदर मुखवटा घेऊन फिरणारे महाशय कुठं हरवतात हा मात्र संशोधनाचा विषय आहे.म्हणूनच म्हणावेसे वाटते कि,विश्वकर्मीय सुतार समाजाला खऱ्या अर्थाने विकासात्मक दूरदृष्टी असणाऱ्या आणि समाजहित जोपासणाऱ्या कर्तृत्ववान नेतृत्वाची गरज आहे.म्हणजेच समाजात विकासात्मक आणि समाज प्रबोधनात्मक दूरदृष्टी असलेलं नेतृत्व असेल तरच समाजाचा सामाजिक सर्वांगीण विकास होईल.

**प्रमोद सूर्यवंशी :-**
**८६०५५६९५२१,चिखली,मातृतीर्थ,बुलढाणा**

# पवित्र पोर्टल शिक्षक भरती संदर्भातील धोरणात्मक त्रुटी दूर करून गुणवंत्ता धारक भावी शिक्षकांना न्याय व समान संधी मिळण्यासाठी धरणा आंदोलन.




विशेष प्रतिनिधी आझाद मैदान मुंबई – सुशिक्षित बेरोजगार तरुणाच्या समस्या आपण नेहमी वाचतो. पण राज्यात मोठ्या प्रमाणात शिक्षक आहेत. त्यांची शासनाच्या पवित्र पोर्टल वर नांव नोंदणी झाली आहे. तरी त्यांना न्याय मिळत नाही.मुंबईच्या आझाद मैदानात अधिवेशनाच्या काळात अनेक संघटना न्याय मिळविण्यासाठी धरणा आंदोलन करतात. पण त्यांचे निवेदन घेऊन आश्वसना शिवाय त्यांच्या पदरी काय पडत नाही.महाराष्ट्र राज्यातील पवित्र पोर्टल शिक्षक भरती प्रक्रिया पारदर्शक गतिमान व न्याय व्हावी यासाठी युवा शैक्षणिक व सामाजिक न्याय संघटना महाराष्ट्र यांनी हिवाळी अधिवेशना दरम्यान एल्गार अंदोलन केले होते. त्यावेळी पवित्र पोर्टल वर शिक्षक नांव नोंदणी आठ दिवसात सुरु करण्यात आली होती. त्यात हजारो नव्हे लाखो शिक्षकांची नांव नोंदणी झाली होती पण त्यांची अंमलबजावणी करतांना प्रक्रियेदरम्यान काही धोरनात्मक अडचणी व अन्यायकारक बाबी निदर्शनास येत असून त्यामुळे पात्र व गुणवत्ता धारक उमेदवारांना समान संधी मिळण्यात अडथळे निर्माण होत आहेत.त्या विरोधात अर्थसंकल्प अधिवेशनावर आझाद मैदानात संघटनेच्या वतीने खालील मागण्यासाठी धरणा आंदोलन घेण्यात आले होते.

१) सद्य स्थितीत शिक्षक उमेदवारांना मर्यादित प्राधान्यक्रम देण्याची अट असल्यामुळे अनेक गुणवत्ता धारक शिक्षक उमेदवारांना त्यांच्या गुणवत्ते नुसार संधी मिळत नाही. त्यासाठी सर्व पात्र उमेदवारांना न्याय व समान संधी मिळावी यासाठी मर्यादित प्राधान्यक्रम रद्द करून अमर्याद (णपश्रळाळींशव झीशषशीशपलश) करण्याबाबत शासन निर्णय घ्यावा. २) खाजगी व्यवस्थापनातील ८० टक्के रिक्त पदे भरण्यास मंजुरी देणे.१ जानेवारी २०२६ रोजी शासन निर्णयाने दिनांक ३१ मे २०२६ पर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आस्थापनांमध्ये ८० टक्के पदे भरण्यास शासनाने मंजुरी दिली आहे. त्याच धर्तीवर अनुदानित विना अनुदानित व खाजगी व्यवस्थापनातील शाळांमध्ये ही ८० टक्के रिक्त पदे भरण्यास तात्काळ मंजुरी द्यावी. जेणेकरून शिक्षकांची कमतरता दूर होऊन विध्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळता येईल. ३) नवीन संच मान्यता धोरण (कोकण पॅटर्न) राज्यभर राबविणे. समान व न्याय धोरण राबविण्यासाठी नवीन संच मान्यता धोरण संपूर्ण महाराष्ट्र राज्यात लागू करण्यात यावे. ४) कला क्रीडा कार्यानुभव इत्यादी विशेष शिक्षकांची शिक्षक भरती राबविण्यात यावी. ५) राज्यातील पट संख्येच्या अटीवर एकही जिल्हा परिषदेची शाळा बंद होणार नाही यांची तोंडी माहिती ऐवजी लेखी पत्रक निर्गमित करावे. ६) समाजकल्याण व निवासी आश्रम शाळा विभागाची शिक्षक भरती पवित्र पोर्टल करणे:समाजकल्याण विभाग व निवासी शाळा मधील शिक्षक भरती देखील पवित्र पोर्टलच्या माध्यमातून पारदर्शक पद्धतीने करण्यात यावी. ७) शिक्षक सेवक कालावधी रद्द करावा, किंवा एक वर्षाचा करावा.वरील सर्व मागण्यांचा सहानुभूतीपूर्वक व सकारात्मक विचार करून तात्काळ योग्य तो शासन निर्णय व्हावा असे संदीप कांबळे अध्यक्ष युवा शैक्षणिक व सामाजिक न्याय संघटना यांनी निवेदना द्वारे दिला आहे. अन्यथा गुणवत्ता धारक भावी शिक्षकां न्याय मिळवून घेण्यासाठी लोकशाही मार्गाने तीव्र जन आंदोलन करण्यास बाध्य व्हावे लागेल असा इशारा संघटनेच्या वतीने देण्यात आला.

तरुण शिक्षकांवर होणाऱ्या अन्यायाविरोधात सतत सनदशिर मार्गाने संघर्ष करणारे तरुण तडपदार नेते संदीप कांबळे ९१४५१५७७७०,अध्यक्ष युवा शैक्षणिक व सामाजिक न्याय संघटना,मू-पो-बिल्लाळी,तालुका -मुखेड,जिल्हा नांदेड.येथील ग्रामीण भागातील आहेत. आझाद मैदानांत पत्रकार कामगार नेते सागर तायडे यांनी त्याची मुलाखत घेतली.

# चवदार तळे सत्याग्रह : पाण्याच्या एका घोटासाठी लढलेली मानवतेची क्रांती



भारतीय समाजाच्या इतिहासात काही घटना अशा आहेत की त्या केवळ आंदोलन नसतात, तर त्या मानवी स्वाभिमानाच्या क्रांतीचे टर्निंग पॉइंट ठरतात. ज्या घटनांनी हजारो वर्षांच्या सामाजिक अन्यायाला थेट आव्हान दिले, समाजाच्या अंतरात्म्याला हादरवले आणि समानतेच्या संघर्षाला नवे बळ दिले. अशीच एक ऐतिहासिक घटना म्हणजे महाड सत्याग्रह, ज्याला आपण चवदार तळे सत्याग्रह म्हणून ओळखतो. हा सत्याग्रह केवळ पाण्यासाठी नव्हता; तो होता मानवी हक्कांसाठीचा, स्वाभिमानासाठीचा आणि समतेसाठीचा लढा. एका घोट पाण्यासाठी दलित समाजाला शतकानुशतके झुंज द्यावी लागली, ही वस्तुस्थिती भारतीय समाजाच्या इतिहासातील सर्वात वेदनादायी अध्यायांपैकी एक आहे. आज या सत्याग्रहाची आठवण करताना एक प्रश्न प्रत्येकाच्या मनात उभा राहतो की, मानवी स्वाभिमानासाठी लढलेली ती क्रांती आपण खरोखर समजून घेतली आहे का?

भारतीय समाजात शतकानुशतके अस्पृश्यतेची क्रूर परंपरा अस्तित्वात होती. समाजातील काही घटकांना मंदिरात प्रवेश नव्हता, शाळेत बसण्याचा अधिकार नव्हता, सार्वजनिक रस्त्यांवर चालण्यासही बंदी होती. इतकेच नव्हे तर पाणी पिण्याचाही अधिकार नाकारला गेला होता. गावातील विहिरी, तळी आणि पाणवठे हे तथाकथित उच्चवर्णीयांच्या मालकीचे मानले जात. अस्पृश्य समजल्या गेलेल्या समाजाला पाण्याच्या एका घोटासाठीही अपमान सहन करावा लागत होता. ही केवळ सामाजिक विषमता नव्हती; ती मानवतेच्या विरोधातील अन्यायाची पराकाष्ठा होती. महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्यातील महाड हे छोटेसे शहर भारतीय सामाजिक क्रांतीचे ऐतिहासिक केंद्र बनले. येथील चवदार तळे हे सार्वजनिक पाणवठे होते. महाड नगरपालिकेने १९२४ मध्ये ठराव करून हे तळे सर्वांसाठी खुले असल्याचे जाहीर केले होते. परंतु प्रत्यक्षात दलित समाजाला त्या पाण्याचा वापर करण्याची परवानगी नव्हती. कागदावर अधिकार होता; पण वास्तवात अपमान आणि बंदी होती. याच पार्श्वभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या अन्यायाला थेट आव्हान देण्याचा निर्णय घेतला. त्यांना ठाऊक होते की हा संघर्ष केवळ पाण्यासाठी नाही; हा संघर्ष आहे मानवी समानतेसाठी.

१९ मार्च १९२७ रोजी महाड येथे हजारो दलित बांधव एकत्र जमले. दुसऱ्या दिवशी म्हणजे २० मार्च १९२७ रोजी डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली लोकांनी चवदार तळ्याकडे मोर्चा काढला. इतिहासातील तो क्षण खरोखरच अद्वितीय होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी चवदार तळ्याचे पाणी हातात घेतले आणि ते प्राशन केले. तो केवळ पाण्याचा घोट नव्हता; तो होता मानवी स्वाभिमानाचा उद्घोष. त्या क्षणी हजारो वर्षांची भीती, गुलामी आणि अपमान यांना पहिल्यांदाच थेट आव्हान दिले गेले. हजारो लोकांनी त्या तळ्याचे पाणी पिऊन आपल्या समानतेचा अधिकार घोषित केला. परंतु या घटनेनंतर समाजातील सनातनी शक्तींनी या आंदोलनाचे स्वागत केले नाही. उलट प्रचंड विरोध झाला. अनेक ठिकाणी दलितांवर हल्ले झाले. चवदार तळे तथाकथित शुद्ध करण्यासाठी त्यात गंगाजल टाकण्याचे प्रकारही घडले. ही घटना दाखवून देते की समानतेचा संघर्ष किती कठीण आणि वेदनादायी होता. तरीही हा संघर्ष थांबला नाही. चवदार तळे सत्याग्रहाने भारतीय समाजात एक नवा विचार रुजवला. मानव हा मानवच आहे; त्याला पाणी, हवा आणि जीवनावर समान अधिकार आहे. हा विचार पुढे जाऊन भारतीय संविधानाच्या मूलभूत मूल्यांमध्ये प्रतिबिंबित झाला.

चवदार तळे सत्याग्रह हा दलित चळवळीच्या इतिहासातील पहिला मोठा सार्वजनिक आंदोलन मानला जातो. याच संघर्षाने पुढील अनेक सामाजिक चळवळींना प्रेरणा दिली. तो केवळ एका तळ्याचा प्रश्न नव्हता; तो होता मानवी प्रतिष्ठेचा प्रश्न. आज भारतात संविधानाने सर्वांना समान अधिकार दिले आहेत. परंतु सामाजिक विषमता अजूनही पूर्णपणे संपलेली नाही. अनेक ठिकाणी जातीय भेदभाव, सामाजिक बहिष्कार आणि अन्याय आजही दिसतो. अशा वेळी चवदार तळे सत्याग्रहाची आठवण आपल्याला जागृत करते. कारण हा संघर्ष आपल्याला सांगतो, अधिकार मिळवण्यासाठी संघर्ष करावा लागतो. आजच्या पिढीने चवदार तळे सत्याग्रह केवळ इतिहास म्हणून वाचू नये. तो समानतेचा आणि मानवतेचा धडा म्हणून समजून घ्यायला हवा. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दाखवलेला मार्ग म्हणजे संघर्ष, संघटन आणि जागृतीचा मार्ग आहे. तो मार्ग आजही तितकाच महत्त्वाचा आहे.

चवदार तळे सत्याग्रह हा केवळ एका तळ्याच्या पाण्यासाठी लढलेला संघर्ष नव्हता; तर तो होता मानवतेच्या स्वाभिमानाचा महासंग्राम. आज आपण सहजपणे पाण्याचा घोट घेतो; परंतु त्या एका घोटामागे हजारो लोकांचा संघर्ष, अपमान आणि त्याग दडलेला आहे. म्हणूनच चवदार तळे सत्याग्रह हा भारतीय सामाजिक इतिहासातील समतेचा दीपस्तंभ आहे. आज या ऐतिहासिक संघर्षाचे स्मरण करताना आपण स्वतःला एक प्रश्न विचारायला हवा. आपण खरोखर समतेचा समाज निर्माण करण्यासाठी प्रयत्न करत आहोत का? कारण पाण्याच्या एका घोटासाठी लढलेली ती क्रांती आजही आपल्याला सांगते, मानवतेपेक्षा मोठे कोणतेही धर्म, जात किंवा परंपरा असू शकत नाही. चवदार तळे सत्याग्रहाच्या स्मृतिदिनानिमित्त सर्वांना समता, स्वाभिमान आणि मानवतेच्या मूल्यांची जपणूक करण्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा!

**प्रविण बागडे**
**नागपूर**
**भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९**

# ठाणे - घोडबंदर रोड वरील वाहतूक कोंडीला टायर पंचर वाले जबाबदार !

ठाणे. ( विशेष प्रतिनिधी ) ठाणे घोडबंदर रोडवरील वाढत्या वाहतूक कोंडीमागील एक धक्कादायक आणि दुर्लक्षित कारण समोर आले आहे. रस्त्याच्या कडेला उभे राहून व्यवसाय करणाऱ्या टायर पंचर दुरुस्ती करणाऱ्यांकडून मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण होत असल्यामुळे वाहनचालकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.



घटनास्थळी प्रत्यक्ष पाहणे केल्यास, घोडबंदर रोडच्या विविध ठिकाणी टायर पंचर दुरुस्ती करणारे व्यावसायिक रस्त्याच्या कडेला आपली साधने, ट्यूब आणि इतर साहित्य पसरवून बसलेले दिसतात. विशेष म्हणजे, काही ठिकाणी हे अतिक्रमण रस्त्याच्या कडेला मर्यादित न राहता तब्बल १० ते १२ फूट आतपर्यंत वाढलेले आहे. बांबू किंवा काठ्यांच्या सहाय्याने ट्यूब लावून ठेवण्याची पद्धत अवलंबली जात असल्याने रस्त्याची रुंदी कमी होत आहे. या अतिक्रमणामुळे आधीच रहदारीने गजबजलेल्या घोडबंदर रोडवर वाहतूक कोंडी अधिक तीव्र होत आहे. वाहनचालकांना मार्ग काढताना मोठी कसरत करावी लागत असून, अपघातांचा धोका देखील वाढला आहे. विशेषतः सकाळ आणि संध्याकाळच्या गर्दीच्या वेळेत या समस्येची तीव्रता अधिक जाणवते. स्थानिक वाहनचालकांकडून याबाबत तीव्र नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

रस्त्यावर आधीच मोठ्या प्रमाणात वाहने असतात, त्यात अशा प्रकारचे अतिक्रमण झाल्यामुळे आमचा प्रवास अधिकच त्रासदायक होतो, अशी प्रतिक्रिया एका वाहनचालकाने दिली. या पार्श्वभूमीवर ठाणे शहर पोलीसांच्या वाहतूक शाखेने या प्रकाराकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज व्यक्त होत आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी तात्काळ पाहणी करून अतिक्रमण हटवण्याची कारवाई करावी, तसेच अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी नियमित मोहीम राबवावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

घोडबंदर रोडवरील वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी आणि नागरिकांचा त्रास कमी करण्यासाठी ठोस पावले उचलली जाणार का ? या आणि ठाणे मनपा व ठाणे शहर पोलीस संयुक्त कारवाई करणार का ? याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# शिक्षण सहसंचालक डॉ. बाबासाहेब भोसले यांचे स्वागत



लातूर : नांदेड येथील विभागीय शिक्षण सहसंचालक डॉ. बाबासाहेब भोसले यांनी राजमाता जिजामाता बी.एड. कॉलेजला नुकतीच सदिच्छा भेट दिली असता कॉलेजतर्फे संस्थेचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांच्या हस्ते डॉ. भोसले यांचा शाल, फेटा व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आला.

यावेळी प्रमुख पाहुणे नागनाथ बुटकुलवार यांच्यासह संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, राजमाता जिजामाता कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, संस्था संचालक कविता केंद्रे, अश्विनी केंद्रे, राजेंद्र जायेभाये, अरुण करदुरे यांची प्रमुख उपस्थिती होती. सूत्रसंचालन डॉ. नाजमीन सय्यद यांनी केले तर आभार राजमाता जिजामाता बी. एड. कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. एम. चव्हाण यांनी मानले. प्रारंभी प्राचार्य डी. एन. केंद्रे यांनी डॉ. बाबासाहेब भोसले व नागनाथ बुटकुलवार यांचे स्वागत केले. यावेळी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# दलित अपंग व्यक्तीवर कनिष्ठ अभियंता यांचा अन्याय; महावितरणच्या कनिष्ठ अभियंता यांच्याकडून सतत नागरिकांना दादागिरीची भाषा- विनायक लोंढे



केज/प्रतिनिधी-दलित समाजाच्या अपंग व्यक्तीवर कनिष्ठ अभियंता या अन्याय करत आहेत तर केज येथील महावितरण कार्यालयात कार्यरत असल्यापासून कनिष्ठ अभियंता यांच्याकडुन सतत नागरिकांना दादागिरीची भाषा वापरत आहेत असा आरोप विनायक लोंढे यांनी लेखी निवेदनाद्वारे केला आहे व तशा आशियाचे लेखी निवेदन उप अभियंता, उपविभाग केज यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिले आहे.याबाबतची सविस्तर माहिती अशी की, विनायक गंगाधर लोंढे रा.रमाई नगर,बीड रोड केज येथील रहिवाशी आहेत ते दलित समाजाचे असून ते स्वतः ७५ टक्के अपंग आहेत. विनायक लोंढे यांना महावितरण कार्यालयाकडून कसल्याच प्रकारची लेखी व तोंडी पूर्वकल्पना न देताच महावितरण च्या कनिष्ठ अभियंता श्रीमती शितल सय्यद व त्यांच्या सहकाऱ्यांनी लोंढे यांचा वीजपुरवठा बंद केला आहे. तसेच लोंढे यांना दर महिन्याचे वीज बिल न देता व नोटीस न देताच त्यांचे विज कनेक्शन कट केले आहे. तसेच वीज पुरवठा चालू ठेवण्यासाठी पाच हजार रुपये द्या नसता तुमचा वीजपुरवठा तोडला जाईल. अशी पैशाची मागणी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केली आहे असा गंभीर स्वरूपाचा आरोप त्यांनी केला आहे.

त्या अनुषंगाने विनायक लोंढे यांनी दिनांक ७ मार्च २०२६ रोजी उपाभियंता यांना लेखी अर्ज देऊन दिनांक १० रोजी त्यांच्या सहकार्य सोबत उपविभागीय कार्यालयासमोर रस्ता रोको आंदोलन केले परंतु महावितरण कार्यालयाकडून त्यांच्या मागणीची दखल घेण्यात आली नाही. विनायक लोंढे हे लोकशाही पद्धतीने त्यांच्या न्याय हक्कासाठी त्यांनी आंदोलन केले असता संबंधित कनिष्ठ अभियंता शितल सय्यद यांनी विनायक लोंढे व त्यांना सहकार्य करणाऱ्याच्या विरुद्ध खोटी तक्रार केली आहे असे माध्यमांशी बोलताना लोंढे यांनी सांगितले. त्याचबरोबर लोंढे यांनी संबंधित कनिष्ठ अभियंता यांच्या विरोध व त्यांच्या न्याय हक्कासाठी आंदोलन केले असता दिनांक ११ मार्च २०२६ रोजी कनिष्ठ अभियंता यांनी वरिष्ठांची परवानगी न घेताच कार्यालयात विनापरवानगी पत्रकार परिषद घेऊन आमची नाहक बदनामी केली आहे. तसेच संबंधित कनिष्ठ अभियंता यांनी काही न्यूज चॅनलला मुलाखत देऊन लोंढे यांच्या वैयक्तिक जीवनावर व चारित्र्यावर शिंतोडे उडवून त्यांची जनसामान्यात व प्रशासनात नाहक बदनामी केली आहे. लोंढे हे त्यांच्या न्याय हक्कांसाठी लोकशाही पद्धतीने १० मार्च रोजी आंदोलन करूनही महावितरण कार्यालयाकडून अध्यात्मिक त्यांना न्याय मिळाला नाही व संबंधितांवर अद्यापही कारवाई करण्यात आलेली नाही. तसेच संबंधित कनिष्ठ अभियंता यांनी वरिष्ठांच्या विनापरवानगीने महावितरण कार्यालयात घेतलेली पत्रकार परिषदेही नियमबाह्य आहे त्यामुळे संबंधित कनिष्ठ अभियंता व त्यांना सहकार्य करणाऱ्या कर्मचाऱ्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. दिनांक ७ रोजी त्यांनी दिलेल्या लेखी तक्रारी अर्जानुसार संबंधितावर तात्काळ कारवाई करण्यात यावी अशी लेखी निवेदनाद्वारे लोंढे यांनी मागणी केली आहे व संबंधित अधिकारी कर्मचारी यांच्यावर लेखी निवेदनाद्वारे वरिष्ठाकडे गंभीर आरोप केले आहेत. जर प्रशासनाने संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई न केल्यास दिनांक २० मार्च २०२६ रोजी महावितरण कार्यालय येथे आत्मदहन करणार आहे असा प्रशासनाला निवेदनाद्वारे इशारा दिला आहे. या लेखी निवेदनाच्या प्रती उपअभियंता केज, जिल्हाधिकारी बीड, मुख्य अभियंता महावितरण परीमंडळ लातूर, अधिक्षक अभियंता बीड, उपजिल्हाधिकारी आंबेजोगाई, कार्यकारी अभियंता आंबेजोगाई, पोलीस अधीक्षक बीड, तहसीलदार केज, पोलीस निरीक्षक पोलीस ठाणे केज यांना दिल्या आहेत.यावेळी माध्यमांशी बोलताना विनायक लोंढे यांनी संबंधित कनिष्ठ अभियंता व संबंधित कर्मचारी यांच्यावर गंभीर स्वरूपाचे आरोप करत वरिष्ठ अधिकारी हे संबंधित कनिष्ठ अभियंता यांना जाब विचारतील का? असा सवाल उपस्थित केला.

सदर प्रकरणाच्या अनुषंगाने आमच्या प्रतिनिधींनी या प्रकरणाविषयी माहिती घेण्यासाठी उपअभियंता श्री सय्यद साहेब यांच्या मोबाईल दूरध्वनी क्रमांक७८७५७६२३२३ व कार्यकारी अभियंता साहेब, यांचा मोबाईल क्रमांक ७८७५७६२००८ या नंबर वर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता उप अभियंता साहेब व कार्यकारी अभियंता साहेब यांचा संपर्क होऊ शकला नाही.

# गुढीपाडवा : उत्सव की केवळ इव्हेंट?

बदलत्या काळातील सणसंस्कृतीवर एक विचारप्रवर्तक दृष्टिक्षेप

विजयकुमार कट्टी




गुढीपाडवा हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनातील एक अत्यंत महत्त्वाचा सण मानला जातो. नववर्षारंभ, मंगलता, विजय, कुटुंबीय एकात्मता आणि आध्यात्मिक आशय यांचा सुंदर संगम या सणात दिसून येतो. परंपरेने पाहता, गुढीपाडवा हा केवळ दिनदर्शिकेतील बदल नसून जीवनात नवा आरंभ, नवी ऊर्जा आणि मूल्यांचे पुनर्स्मरण घडवणारा उत्सव आहे. परंतु आजच्या बदलत्या सामाजिक, शहरी आणि माध्यमप्रेरित जीवनशैलीत एक महत्त्वाचा प्रश्न उभा राहतो आपण गुढीपाडवा अजूनही उत्सव म्हणून जगत आहोत का, की तो हळूहळू इव्हेंटमध्ये रूपांतरित होत आहे?

हा प्रश्न केवळ परंपरा विरुद्ध आधुनिकता असा नाही. हा प्रश्न सणाच्या अर्थाविषयी आहे. कारण उत्सव आणि इव्हेंट यांमध्ये स्वरूपाने साधर्म्य असले, तरी आशयाने मोठा फरक असतो. उत्सव मनात घडतो; इव्हेंट बाहेर घडतो. उत्सव जोडतो; इव्हेंट दाखवतो. उत्सवात स्मृती, मूल्ये, कुटुंब आणि समुदाय असतो; इव्हेंटमध्ये नियोजन, सादरीकरण, आकर्षण आणि दृश्य परिणाम असतो. या दोन स्वरूपांतून मानवी मानसशास्त्रावरही वेगळा परिणाम होत असतो.

परंपरागत गुढीपाडवा पाहिला तर घर, देवघर, अंगण, कुटुंब, वडीलधाऱ्यांचे आशीर्वाद, गुढी उभारणे, कडुलिंब-गूळ, पंचांगश्रवण, पारंपरिक भोजन आणि आपलेपणा या सर्वांमधून सणाची एक अर्थपूर्ण रचना उभी राहत असे. हा सण व्यक्तीला स्वतःपेक्षा मोठ्या सांस्कृतिक परंपरेशी जोडत असे. घरातील लहान मुलांना या सणातून मूल्यांचे अनौपचारिक शिक्षण मिळत असे. स्वच्छता, शिस्त, कृतज्ञता, परस्पर सन्मान आणि नवीनतेचे स्वागत यांची जाणीव सणाच्या प्रक्रियेतून होत असे. अशा प्रकारे गुढीपाडवा हा केवळ धार्मिक विधी नव्हता; तो सामाजिक आणि मानसिक आरोग्यालाही पोषक असा जीवनसंस्कार होता.

आजच्या काळात मात्र साजरीकरणाचे रूप बदललेले दिसते. सार्वजनिक सोहळे, आकर्षक मिरवणुका, छायाचित्रकेंद्री अभिव्यक्ती, सोशल मीडियावरील पोस्ट्स, डीजे संस्कृती, फॅशनप्रधान सहभाग आणि प्रदर्शनात्मकता यांना अधिक महत्त्व मिळताना दिसते. या बदलात ऊर्जा आहे, नवता आहे, तरुणाईचा सहभाग आहे; म्हणून त्याला पूर्णतः नाकारता येणार नाही. परंतु या नव्या साजरीकरणात सणाचा मूळ आशय कितपत जपला जातो, हा विचार महत्त्वाचा आहे.

आज अनेकदा सण हा अनुभव म्हणून नव्हे, तर प्रदर्शन म्हणून अधिक दिसतो. श्रद्धेपेक्षा प्रतिमा, भावनेपेक्षा उपस्थिती, अर्थापेक्षा आकर्षण, आणि कुटुंबीय एकत्रतेपेक्षा सामाजिक दृश्यता महत्त्वाची ठरू लागते. हीच जागा आहे जिथे उत्सव हळूहळू इव्हेंटमध्ये बदलतो. अशा वेळी सणाची बाह्य रंगत वाढते, पण अंतःकरणातील स्पर्श कमी होण्याचा धोका निर्माण होतो.

मानसशास्त्रीय दृष्टीने पाहिले तर हा बदल लक्षणीय आहे. पारंपरिक सण मानवी मनाला स्थैर्य, ओळख, सांस्कृतिक सातत्य आणि भावनिक आधार देतात. त्यातून मी कुठल्या तरी मोठ्या, अर्थपूर्ण परंपरेचा भाग आहे ही भावना दृढ होते. पण सण जेव्हा बाह्य प्रदर्शनाचे माध्यम बनतो, तेव्हा व्यक्तीच्या मनात तुलना, दिखावा, सामाजिक मान्यता मिळवण्याची धडपड आणि दिसणे याला अधिक महत्त्व मिळू शकते. परिणामी उत्साह असतो, पण शांतता नसते; गर्दी असते, पण आत्मीयता नसते; दृश्य भव्यता असते, पण अंतर्मुखता नसते.

हा प्रश्न केवळ गुढीपाडव्यापुरता मर्यादित नाही. भारतातील विविध प्रांतांतील नववर्ष किंवा पारंपरिक सण उगादी, बैसाखी, विषू, पुथांडु, बिहू, नवरेंह हे सर्व मूळतः जीवनाशी, निसर्गाशी, कुटुंबाशी आणि मूल्यांशी जोडलेले आहेत. जर हे सर्व सण केवळ इव्हेंट मॅनेजमेंटच्या चौकटीत बसवले गेले, तर आपण परंपरेचे बाह्य रूप राखू; पण तिचा आत्मा हरवू.

तथापि, आधुनिकतेला दोष देणे हा उपाय नाही. प्रश्न आधुनिकतेचा नसून उथळतेचा आहे. आधुनिक माध्यमे, सार्वजनिक सहभाग, डिजिटल अभिव्यक्ती आणि नव्या पिढीचे सणाशी नव्या रूपात जोडले जाणे हे सकारात्मकही ठरू शकते. पण त्यासाठी साजरीकरणाच्या केंद्रस्थानी अर्थ, मूल्य आणि संवाद असणे आवश्यक आहे. सण बदलू शकतो; परंतु त्याचा आत्मा रिकामा होता कामा नये.

आज समाज म्हणून आपल्याला काही प्रामाणिक प्रश्न स्वतःला विचारण्याची गरज आहे. गुढीपाडवा साजरा करताना आपण खरोखर नवा आरंभ अनुभवतो का? या सणातून मुलांना काही मूल्य शिकते का? कुटुंब अधिक जवळ येते का? आपल्या मनात कृतज्ञता, नम्रता आणि चिंतन यांना जागा मिळते का? की आपण केवळ उपस्थिती, छायाचित्रे आणि बाह्य रंगत यांपुरते मर्यादित राहतो?

या प्रश्नांची उत्तरेच ठरवतील की गुढीपाडवा आपल्या जीवनात आजही उत्सव आहे की तो इव्हेंट बनला आहे.

गुढी ही घराबाहेर उभारली जाते; पण तिचा अर्थ मनात उभा राहिला पाहिजे. नववर्ष हे केवळ दिनांक बदलणे नाही; ते दृष्टी बदलणे आहे. सण हा केवळ परंपरेचा सन्मान नसून, आपल्या जीवनमूल्यांचे पुनरुज्जीवन करण्याची संधी आहे. जर गुढीपाडवा आपल्याला नवीन कपडे देतो पण नवी जाणीव देत नाही, तर आपण काहीतरी महत्त्वाचे हरवत आहोत.

आज गरज आहे ती नुसत्या साजरीकरणाची नाही, तर सजग साजरीकरणाची. परंपरेचे अंधानुकरण नव्हे, तर जाणिवपूर्वक पुनरुज्जीवन आवश्यक आहे. गुढीपाडव्याला पुन्हा घर, कुटुंब, संवाद, मूल्ये आणि अंतर्मुखता यांच्याशी जोडण्याची आवश्यकता आहे. तेव्हाच तो खऱ्या अर्थाने उत्सव राहील.

शेवटी, हा लेख टीका म्हणून नव्हे, तर एक सामूहिक आत्मपरीक्षण म्हणून पाहावा. आपण गुढीपाडवा किंवा आपल्या भागातील असा कोणताही सांस्कृतिक सण कसा अनुभवता? तो आपल्यासाठी उत्सव आहे की इव्हेंट? आपल्या निरीक्षणात, बदलत्या काळात सणांचा आशय अधिक गडद झाला आहे की अधिक उथळ?

आपले विचार, अनुभव आणि प्रतिक्रिया अवश्य कळवा. कारण संस्कृतीचे भवितव्य घोषणांमध्ये नव्हे, तर संवादात आणि सजगतेत घडत असते.

**(लेखक : विजयकुमार कट्टी)**

# कार्पोरेट सेक्टरमध्ये समाजकार्य विद्यार्थ्यांना रोजगाराची सुवर्णसंधी.-गणेश चव्हाण



लातूर -भारतामध्ये सन १९६०मध्ये टाटा समाज विज्ञान संस्था, मुंबईच्या माध्यमातून व्यावसायिक समाजकार्याची सुरुवात झाली. महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील समाजकार्य विभाग सन १९८३ पासून व्यावसायिक समाजकार्यकर्ते व अभियंते घडविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करीत आहे. आज कार्पोरेट सेक्टरमध्ये समाजकार्य विद्यार्थ्यांसाठी व्यवसायाची सुवर्णसंधी उपलब्ध आहे त्याचा लाभ समाजकार्याच्या विद्यार्थ्यांनी घ्यावा असे आवाहन कनेक्ट फॉर (रोझी ब्ल्यु फाऊंडेशन), मुंबईचे सामाजिक कार्यकर्ते तथा माजी विद्यार्थी गणेश चव्हाण यांनी केले.

महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील समाजकार्य विभागातर्फे बीएसडब्ल्यू तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन कार्यक्रमाचे महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रो.डॉ.आनंद शेवाळे आणि मुख्य समन्वयक डॉ.नल्ला भास्कर रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन करनेत आले होते. यावेळी समाजकार्य विभाग प्रमुख प्रो.डॉ.दिनेश मौने, प्रा.काशिनाथ पवार, प्रो.डॉ.संजय गवई आणि प्रा.आशिष स्वामी यांची उपस्थिती होती.

या सत्रामध्ये गणेश चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना एमएसडब्ल्यू शिक्षणातील विविध संधी, देशातील नामांकित समाजकार्य महाविद्यालयातील प्रवेश प्रक्रिया, पूर्व तयारी, गट चर्चा, फील्ड वर्क, अहवाल, प्रभावी सादरीकरण आणि मुलाखत आदि महत्त्वाच्या बाबीची सविस्तर माहिती दिली. तसेच विद्यार्थ्यांच्या अडचणी समजून घेत त्यांच्या प्रश्नांचे समाधान केले. विशेषतः इंग्रजी संभाषणाबाबत असलेली भीती दूर करण्याचा प्रयत्न केला. विविध कौशल्ये, व्यक्तिमत्त्व विकास, सादरीकरण शैली आणि परीक्षा तयारी याबाबतही त्यांनी स्वतःचे अनुभव विद्यार्थ्यांना सांगितले.

याच कार्यक्रमात आझिम प्रेमजी, यूनिवर्सिटी, बेंगलोर येथे एम.ए.डेव्हलपमेंट या पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी निवड झालेल्या अजय राऊत आणि गौरी रसाळ या विद्यार्थ्यांचा सत्कारही करण्यात आला.

या कार्यक्रमाला बीएसडब्ल्यू तृतीय वर्षाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर - ४१३५१२ येथे प्रकाशित केले.